# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.10.2025** **वारःशुक्रवार**

---

1. संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या तेजस लढाऊ विमानाचं आज लोकार्पण
2. हरित उर्जा आणि वीज उपलब्धता यामध्ये भारताची वेगानं प्रगती होत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. शेतकऱ्यांच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी निश्चित कालमर्यादा आखून घेण्याचे कृषीमंत्र्यांचे निर्देश
4. जी 20 संघटनेमध्ये सहभागी देशांनी महत्वाकांक्षा आणि अंमलबजावणी दरम्यानचा पूल म्हणून भूमिका पार पाडावी पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांचं आवाहन आणि
5. खेलो इंडिया स्पर्धा 24 नोव्हेंबरपासून राजस्थानमध्ये सुरू होणार

**संरक्षणमंत्री**

तेजस या संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या हलक्या लढाऊ विमानाचं लोकार्पण आज संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्रात नाशिक इथल्या हिंदुस्तान एरोनॉटिक्सनं तयार केलेलं हे लढाऊ विमान आज पहिल्यांदा आकाशात झेपावेल. प्रशिक्षणासाठीच्या विमान उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटनही यावेळी संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. बेंगळुरू इथं तेजस उत्पादनाचे दोन प्रकल्प याआधीच सुरू असून नाशिकमधला तिसरा उत्पादन प्रकल्प आहे. दरम्यान, ओझर इथल्या हिंदुस्थान एरोनॉटीक्स लिमीटेड परिसरात साकारण्यात आलेल्या मिनी स्मार्ट टाउनशिपचं उद्घाटन राजनाथ सिंह यांच्या हस्ते काल झालं. या टाऊनशीपमध्ये हरित तंत्रज्ञान,डिजिटल पायाभूत सुविधा आणि समुदाय-केंद्रित सुविधांचा समावेश आहे.

**संरक्षणमंत्री**

संरक्षण क्षेत्रातले बदल आणि युद्धाच्या बदलत्या पद्धती समजून घेऊन त्या स्वीकराण्याची गरज आहे. वेगानं बदलणाऱ्या जगात अत्याधुनिक तंत्रज्ञान ही गरज बनली आहे असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील सल्लागार समितीनं काल पुण्यातील शस्त्रास्त्र संशोधन आणि विकास संस्थेला भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. या समितीनं संस्थेच्या विविध प्रयोगशाळांमध्ये तयार झालेल्या अत्याधुनिक उत्पादनांची यावेळी पाहणी केली. यामध्ये अत्याधुनिक तोफा, पिनाका रॉकेट प्रणाली, झोरावर हा हलका रणगाडा, आकाश क्षेपणास्त्र यांचा समावेश होता.

**राष्ट्रपती**

आदी कर्मयोगी अभियानाच्या राष्ट्रीय परिषदेत आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपस्थित राहणार आहेत. विकसित भारत उद्दीष्टाच्या अनुषंगाने आदिवासी व्यवहार मंत्रालयानं ही परिषद आयोजित केली आहे. आदिवासी गाव 2030 संकल्पना ते अंमलबजावणी ही या परिषदेची प्रमुख संकल्पना आहे. केंद्रिय आदीवासी व्यवहार मंत्री जुअल ओराम यांच्यासह राज्यांचे आदिवासी मंत्री, केंद्रिय आणि राज्यांचे सचिव, जिल्हाधिकारी, प्रशिक्षक तसंच सहयोगी प्रतिनिधी या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

**पंतप्रधान**

हरित उर्जा आणि वीज उपलब्धता यामध्ये भारताची वेगानं प्रगती होत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आंध्र प्रदेशमधल्या कुर्नूल इथं काल विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमीपूजन पंतप्रधानांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. भारताचे ड्रोन हब म्हणून कुर्नूलचा विकास करण्यात येत असल्याची त्यांनी प्रशंसा केली.

विशाखापट्टणमला कृत्रिम बुद्धीमत्ता आणि संपर्क साधनांचं केंद्र म्हणून विकसित करण्याबाबतची संकल्पना त्यांनी यावेळी सादर केली.

**कृषीमंत्री**

शेतकऱ्यांच्या तक्रारी सोडवण्यासाठीच्या उपायांवर चर्चा करण्यासाठी काल केंद्रिय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी एक बैठक घेतली. खतं, बियाणं, कीटकनाशक, पीक विमा योजना आणि पीएम किसान पोर्टल यासंदर्भातल्या तक्रारींबाबत यावेळी चर्चा झाल्याची माहिती कृषी मंत्रालयानं दिली आहे. या तक्रारींचं निवारण करण्यासाठी निश्चित कालमर्यादा आखून घ्यावी तसंच तक्रारीचं पूर्णपणे निराकरण झाल्याशिवाय आणि संबंधित शेतकऱ्याचं संपूर्ण समाधान झाल्याशिवाय फाइल बंद करू नये अशा सूचना कृषीमंत्र्यांनी या बैठकीत दिल्या.

**केव्हीके**

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याणमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी देशभरातील कृषी विज्ञान केंद्र अधिक प्रभावी आणि सक्षम बनवण्याच्या दृष्टिनं आवश्यक धोरणांवर चर्चा करण्यासाठी काल एक उच्चस्तरीय बैठक घेतली. या केंद्रांची व्याप्ती वाढवतानाच लहान शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी त्यांना बळकट करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा प्रसार, प्रशिक्षण आणि कृषी नवोपक्रम देण्यात या केंद्रांची भूमिका महत्त्वाची आहे, असं चौहान यांनी अधोरेखित केलं.

**जी 20**

जी 20 संघटनेमध्ये सहभागी देशांनी प्रत्येक देशाच्या योगदानाचा आदर केला जाईल आणि प्रत्येक देशाची क्षमता वाढेल, या दृष्टीनं काम करत महत्वाकांक्षा आणि अंमलबजावणी दरम्यान एक पूल म्हणून भूमिका पार पाडली पाहिजे, असं केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी म्हटलं आहे. ते काल दक्षिण आफ्रिकेत G20 हवामान आणि पर्यावरणीय शाश्वतता कार्यगटाच्या मंत्रिस्तरीय बैठकीच्या उद्घाटन सत्रात बोलत होते. जैवविविधतेचे व्यापारीकरण करताना सावधगिरी बाळगण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

**बिहार निवडणूक**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. पहिल्या टप्प्यात पाटणा, दरभंगासह 121 मतदारसंघांत 6 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. दरम्यान काँग्रेस पक्षानं आपल्या 48 उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली.

**अत्याचार**

पाकिस्तानमध्ये अल्पसंख्याकांवर होणाऱ्या वाढत्या अत्याचार आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनामुळे या देशाची समाजरचना किती खोलपर्यंत खिळखिळी झाली आहे हे उघड होत असल्याचं 'युरोपियन टाईम्स'मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका अहवालात म्हटलं आहे. पाकिस्तानमध्ये अनेक तथाकथित लोकशाही संस्था पूर्णपणे कमकुवत झाल्या आहेत. त्यामुळे होत असलेल्या अन्यायामुळे आणि सरसकट होणाऱ्या मानवी हक्कांच्या पायमल्लीमुळे नागरिक निराश झाले आहेत, असं या अहवालात म्हटलं आहे.

**परराष्ट्र मंत्रालय**

अफगाणिस्तान आणि पाकिस्तामधल्या परिस्थितीवर भारत लक्ष ठेवून आहे असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल सांगितलं. आपल्या अंतर्गत अपयशाला शेजारी देशांना जबाबदार ठरवण्याची पाकिस्तानची सवय जुनीच आहे असं जयस्वाल पत्रकारांशी बोलताना म्हणाले. अफगाणिस्तानचं सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि स्वातंत्र्य यांना भारताचा पूर्ण पाठिंबा असल्याचं त्यांनी सांगितलं. काबूलमध्ये 2022 पासून तांत्रिकदृष्ट्या भारतीय कार्यालय सुरू आहे. येत्या काही दिवसात त्याचे दूतावासात रुपांतर होईल अशी माहिती त्यांनी दिली.

**खेलो इंडिया**

पाचव्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा 24 नोव्हेंबरपासून राजस्थानमध्ये सुरू होतील. 12 दिवसांच्या या स्पर्धेत 23 क्रीडा प्रकारांसह खोखोचे प्रदर्शन सामने होतील. यावेळी पहिल्यांदाच बीच व्हॉलीबॉल, कॅनोइंग आणि कयाकिंग तसंच सायकलिंग या प्रकारांचा स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. देशभरातल्या विद्यापीठांमधले पाच हजारांपेक्षा जास्त खेळाडू स्पर्धेत सहभागी होणार आहेत अशी माहिती केंद्रिय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी काल दिली. खेलो इंडिया स्पर्धेतून हजारो विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच खेळांमध्ये सहभागी होण्याची प्रेरणा मिळेल आणि एक भारत श्रेष्ठ भारत ही भावना वाढीस लागेल अशी अपेक्षा मांडवीय यांनी व्यक्त केली.

**बॅडमिंटन**

ओडेन्स इथं सुरू असलेल्या डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेननं पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. पुरुष दुहेरीत, सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीनंही उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

**महिला विश्वकरंडक**

आयसीसी महिला क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवणारा ऑस्ट्रेलिया हा पहिला संघ ठरला आहे. काल रात्री विशाखापट्टणम इथं झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने बांगलादेशवर 10 गडी राखून दमदार विजय मिळवला. आज, कोलंबो इथं दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका संघांमध्ये सामन होणार  आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.